# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना

## सन २०१४ — १५

## विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांकरीता

महाराष्ट्र शासनाने केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०१४—१५ करीता पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत. सदर शिष्यवृत्तीकरिता शासनाने विहित केलेले नियम व अटी तसेच अर्ज सादर करण्यासाठीचे वेळापत्रक सोबत जोडत आहे. तरी संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करुन त्याची प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या विभागामार्फत विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावेत.

सहा. कुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/ २९६७ )
दिनांक : ०७. ०८. २०१४ )

प्रत : मा. विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.
आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१.**

# जाहिरात

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१४ - २०१५

केंद्रशासनाकडून **मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०१४-१५ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्विकारले जातील. कोणत्याही परिस्थीतीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच निर्धारित केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत.

❖ **<u>शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :</u>**

११ वी ते पी. एच्. डी, व्यावसायिक (डी. एड्., बी. एड्., एम.एड्., आय. टी. आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम. सी. व्ही. सी. अभ्यासक्रम. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

❖ **<u>किमान पात्रता व अटी :</u>**

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा
३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४) नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.०० लाख इतकी आहे.
६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्याने नजीकच्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे.
९) आवश्यक ती कागदपत्रे अर्जासोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्याने आपले अर्ज प्राचार्यांमार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.

❖ **<u>अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे:</u>**

१) अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसह असावा.
२) माध्यमिक शालांत परीक्षा (दहावी) पासून उत्तीर्ण सर्व परीक्षांच्या गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत.
३) कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणुन शिधापत्रिका, वीज / दुरध्वनी देयक, पारपत्र, निवडणुक ओळखपत्र,आधार कार्ड यापैकी कोणत्याही एका पुराव्याची छायांकीत व साक्षांकीत प्रत जोडावी.
४) विद्यार्थ्याने अल्पसंख्यांक दर्जाबाबतचे, तसेच पालकांचे सन २०१३-१४ चे वार्षिक उत्पन्नाचे स्वयंघोषित घोषणापत्र (Self Declared Declaration).रेव्हेन्यू स्टँप (Revenue Stamp) लावून अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे
५) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची - ज्यावर खातेदाराचे नांव, पत्ता, खाते क्रमांक व आय.एफ.एस. सी. कोडची नोंद आहे, त्याची छायांकित प्रत जोडावी. सदर बँक खाते चालू स्थितीत असावे.
६) आधार कार्डाची छायांकित प्रत जोडावी. (असल्यास)

## ❖ नवीन मंजूरीसाठी अर्ज करण्याची पद्धत :

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नवीन विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खात्याच्या पासबुकवर असलेल्या पूर्ण नावानुसारच संपूर्ण नाव टाकुन नोंदणी करावी. आवश्यक माहिती भरल्यानंतर विद्यार्थ्यांना Temporary Application ID प्राप्त होईल. हा ID वापरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ID जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरचा ID विद्यार्थ्यास अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी होणार आहे. (अर्ज करताना यादीमध्ये आपल्या महाविद्यालयाचे नाव नसेल तर प्राचार्यांशी महाविद्यालयाच्या नावाच्या नोंदणीसाठी संपर्क साधावा.)

३) ऑनलाईन अर्ज सादर करण्यापुर्वी योजनेची मार्गदर्शक तत्वे वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा. विद्यार्थ्याने
त्याचा युजर आय.डी. वापरुन वरील संकेतस्थळावरुन त्याचा ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा.

४) ऑनलाईन अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीच्या अर्जाची प्रिंट काढावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालय / संस्थेमध्ये पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत सादर करावी.

५) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

## ❖ शिष्यवृत्तीचे नुतनीकरण:

केंद्रशासनाने सन २०१४-१५ पासून शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचा अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन तरतूद (New Provision) केलेली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांनी ऑनलाईन भरलेल्या नुतनीकरणाच्या अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे (उदा.मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत, चालू वर्षाची फी भरल्याच्या पावत्या, विद्यार्थ्याच्या नावाचा बँक खात्याचा पुरावा म्हणून बँक पासबुकची पहिल्या पानाची छायांकीत प्रत इत्यादी.) स्कॅन (Scan) करुन www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सुचनांनुसार अपलोड करावीत.

**केंद्रशासनाने सन २०१४-१५ पासून शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी अर्जाची हार्डकॉपी आवश्यक त्या कागदपत्रासह त्यांच्या महाविद्यालयास सादर करण्याची तरतूद रद्द केली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी नुतनीकरणासाठी अर्जाची हार्डकॉपी त्यांच्या महाविद्यालयाकडे सादर करण्याची आवश्यकता नाही.**

विद्यार्थ्यांनी नुतनीकरणाचा अर्ज भरण्याची तसेच आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याची व महाविद्यालयांनी (विद्यार्थ्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांवरुन) विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची सविस्तर कार्यपध्दती www.momascholarship.gov.in आणि www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर दिलेली आहे.

त्यानुसार विद्यार्थ्यांनी ही कार्यपध्दती समजून घेऊन त्यांना प्राप्त झालेला permanant ID वापरुन नुतनीकरणाचा अर्ज www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावर भरावा व महाविद्यालयांनी त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

## ❖ महाविद्यालयीन स्तरावर अर्जाची छाननी व अर्ज पाठविण्याची पद्धत :

संबंधित महाविद्यालयाने / संस्थेने उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्जाद्वारे दिलेली माहिती त्याने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे व्यवस्थित तपासून पाहावी व अर्ज संगणकावर दिलेल्या सुविधांद्वारे ऑनलाईन निश्चित करावा. तसेच पात्र विद्यार्थ्यांचे नवीन मंजुरीचे मूळ अर्ज प्राचार्यांनी स्वाक्षरीसह व सर्व साक्षांकित कागदपत्रांसह संबंधित विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण कार्यालये (मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, जळगांव, अमरावती, नागपूर, पनवेल, सोलापूर) यांचेकडे जाहिरातीत दिलेल्या विहीत मुदतीपर्यंत पाठविणे आवश्यक आहे.विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

अ) महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित महाविद्यालय/संस्थेच्या जिल्ह्यानुसार संबंधित विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण कार्यालयांकडे पाठविण्यात यावेत.

ब) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणारे विद्यार्थी दुसऱ्या राज्यात (महाराष्ट्राबाहेर) शिक्षण घेत असल्यास त्यांच्या महाविद्यालय/संस्थांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जाची पडताळणी (Scrutiny) करुन अर्जाची हार्ड कॉपी स्वाक्षरीसह व सर्व साक्षांकित कागदपत्रांसह, विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील ज्या जिल्ह्याचा रहिवासी असेल त्या संबंधित विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. (www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण कार्यालयांचे पत्ते व त्या कार्यालयांतर्गत येणाऱ्या जिल्हयांची नावे देण्यात आलेली आहेत)

क) महाराष्ट्र राज्याबाहेरचे रहिवासी असलेले परंतु महाराष्ट्रात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यार्थी ज्या राज्याचा रहिवासी असेल त्या राज्याच्या संबंधित नोडल ऑफीसकडे पाठविण्यात यावा. याबाबतची यादी www.momascholarship.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

❖ **महाविद्यालय/संस्थेच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन नोंदणीसाठी :**

ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांचे नाव सदर वेबसाइटवर दिसून येत नाही तसेच ज्या शासनमान्य महाविद्यालय/संस्था यांना अद्यापही आपले युजर आय.डी व पासवर्ड प्राप्त झालेले नाहीत त्यांनी संकेतस्थळावरील ऑनलाईन नोंदणीसाठी आपल्या महाविद्यालय/संस्थांची संपुर्ण माहिती पुढील विहित प्रपत्रामध्ये भरुन ती दिनांक ३१.०८.२०१४ पर्यंत नोडल ऑफिसर, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे ई-मेलवर (scholarshiphd@gmail.com) पाठवावी. शासनमान्य महाविद्यालये/संस्था यांनी त्यांचा कार्यालयीन ई-मेल आय.डी. व प्राचार्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक संचालनालयाच्या वरील ई-मेल आय.डी. वर सादर केल्यानंतरच त्यांना त्यांच्या महाविद्यालय/संस्थांचा युजर आय.डी. व पासवर्ड ई-मेल / एसएमएसद्वारे ऑनलाईन प्राप्त होईल.

**प्रपत्र** (PROFORMA)

| INFORMATION OF THE INSTITUTE FOR POST MATRIC SCHOLARSHIP ONLINE REGISTRATION | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Institute Name | Govt. / Govt. Aided / Private | Whether College Jr. / Sr. | Course / Faculty | University / Board Name | Institute Address with Taluka & Pin Code | Inst. District | Details of the Principal/ Director | | | Details of the Staff handling Scholarship | | |
| | | | | | | | | Name | Mobile No. | E-mail | Name | Mobile No. | E-mail |
| | | | | | | | | | | | | | |

❖ **पासवर्ड विसरलेल्या महाविद्यालय/संस्था यांचेसाठी :**

पूर्वी ऑनलाईन नोंदणी केलेल्या महाविद्यालय/संस्थांनी पुन्हा ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी उपरोक्त प्रपत्र पाठवू नये. त्यांनी OTP (One Time Password) नंबर घेण्यासाठी Forget Password या Link वर Click करुन पूर्वी नोंदणी केलेला ई-मेल आय.डी व मोबाईल नंबर ही माहिती टाकून पाठविण्यात (Forword) यावे. सदर माहिती पूर्वीच्या माहितीशी जुळत असेल तर त्यांना OTP नंबर ई-मेल / एसएमएसद्वारे प्राप्त होईल. OTP नंबर प्राप्त होताच I know my OTP नंबर या Link वर Click करुन विचारलेली माहिती भरुन त्यांचा नवीन पासवर्ड तयार करावा.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१४-१५ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नुतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १ | ऑनलाईन ॲप्लिकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | १५.०९.२०१४ पर्यंत | १०.१०.२०१४ पर्यंत |
| २ | ऑनलाईन सिस्टीमद्वारे भरण्यात आलेल्या अर्जाची हार्ड कॉपी संबंधित विद्यार्थ्याने संस्था/महाविद्यालयास सादर करण्याचा अंतिम दिनांक | २५.०९.२०१४ पर्यंत | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्डकॉपीमधील आवश्यक पाने व इतर आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अर्ज अंतिम करण्यापूर्वी येणाऱ्या सूचनेनुसार अपलोड करावीत. |
| ३ | विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन भरण्यात आलेल्या अर्जास महाविद्यालयाने ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | ०५.१०.२०१४ पर्यंत | ३१.१०.२०१४ पर्यंत |
| ४ | संबंधित विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयांनी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.१०.२०१४ पर्यंत | --- |
| ५ | संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाने महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या अर्जांना ऑनलाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | १५.१०.२०१४ पर्यंत | ०८.११.२०१४ पर्यंत |

महाविद्यालयांनी जाहिरातीनुसार अंतिम दिनांकाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्डकॉपी जशा त्यांच्याकडे प्राप्त होतील तशा त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करुन अर्जाची हार्डकॉपी संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावी. म्हणजे अंतिम दिनांकास निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे अर्जावर कार्यवाही करण्यास होणारा विलंब टाळता येईल._विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जांची पडताळणी (Scrutiny) महाविद्यालय/संस्थांनी ३० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे अन्यथा ३० दिवसांनंतर हे अर्ज आपोआप पुढील टप्प्यावर ओढले जातात (Automatic Pulled) व असे महाविद्यालयाकडून पडताळणी न झालेले अर्ज अपात्र ठरविले जातात.

**विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अर्जाची हार्डकॉपी विहीत दिनांकापूर्वी संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडेच देणे अनिवार्य आहे. अर्ज परस्पर उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथे पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.**

अधिक माहितीसाठी www.momascholarship.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे किंवा संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

**(डॉ. प्र. रा. गायकवाड )**
नोडल ऑफिसर तथा शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.